**(CNR No. MHND060002942019)**
विशेष दिवाणी दावा क्र. ०७/२०१९
प्रफुल्ल देशमुख **वि.** अद्वेत देशमुख वगैरे

## <u>आदेश निशाणी क्र. १९ व निशाणी क्र. २१ वर</u>

प्रतिवादी क्र. १ व २ हे शिक्षण घेत आहेत. प्रतिवादी क्र. ३ हे ज्येष्ठ नागरीक आहेत. प्रकरणातील महत्वाची व आवश्यक कागदपत्रे अद्याप प्राप्त झालेली नाहीत. त्या प्रमाणे उर्वरित प्रतिवादी हे अद्याप हजर झाले नाहीत. या सर्व कारणावरून कैफियत व तुर्तातुर्त मनाई हुकुमाचे म्हणणे देण्यासाठी मुदत देण्यात यावी अशी विनंती करण्यात आली आहे.

२. त्यावरून वादी यांचे वकील यांनी तिव्र आक्षेप नोंदवला आहे. त्यांनी नमूद केले की, वादी हे दावा मिळकतचे ताबेदार आहेत. त्यांना दावा मिळकतच्या ताब्यातून हाकलून देण्याचा प्रतिवादी हे प्रयत्न करत आहेत. विनाकारण कब्जा करण्याचा प्रतिवादी यांचा प्रयत्न आहे. त्यामध्ये प्रतिवादी यांनी मूदत देण्यात येऊ नये अन्यथा मुदत दिली तर दावा मिळकत वरील वादी यांच्या ताब्यास प्रतिवादी यांनी हरकत अडथळा करू नये असा तुर्तातुर्त मनाई हुकुम द्यावा.

३. प्रकरणात प्रतिवादी क्र. ४ ते ६ हे हजर झालेले नाहीत. दावा मिळकत वादी यांचेच ताब्यामध्ये आहे. यासंबंधी स्पष्ट कागदोपत्री पुरावा रेकॉर्डवर दिसून येत नाही. त्यामध्ये एकतर्फा आताच वादी यांच्या हक्कात मागणी केल्याप्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकुम देणे न्यायाचे दृष्टीने योग्य होणार नाही. परंतु, प्रकरण हे स्थावर मिळकतीच्या कब्जा संदर्भातील आहे. उद्यापासून न्यायालयाला उन्हाळी सुट्टी लागणार आहे. प्रकरणाची तातडी विचारात घेता प्रस्तुत प्रकरण हे उन्हाळी सुट्टीमध्ये चौकशीसाठी ठेवणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. पुढील तारीख दि.०७.०५.२०१९ रोजी प्रकरण तुर्तातुर्त मनाई हुकुम साठीच्या अर्जावर सुनावणीसाठी नेमण्यात येत आहे. तोपर्यंत प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांचे म्हणणे दाखल करावे.

स्वाक्षरित/—
(श्रीकृष्ण हरिभाऊ इनामदार)
दिनांक :— ३० एप्रील २०१९. दिवाणी न्यायाधीश व.स्तर, बिलोली.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी नमुद करतो की, पी.डी.एफ करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील/आदेशामधील संपुर्ण मजकुर हा मुळ न्यायनिर्णय/आदेश प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | एम.एफ.एम. सय्यद |
| पिठासन अधिकारी यांचे नाव व पदनाम | : | श्रीकृष्ण हरिभाऊ इनामदार<br>दिवाणी न्यायाधीश व.स्तर, बिलोली |
| आदेश दिनांक | : | ३०.०४.२०१९. |
| आदेशावर पिठासीन अधिकारी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | : | ३०.०४.२०१९. |
| आदेश अपलोड केल्याचा दिनांक | : | ३०.०४.२०१९. |